महाराष्ट्र शासन

सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा,
आरोग्य सेवा (परिवहन),
६०४ शेंडापार्क, आर.के. नगर रोड, कोल्हापूर—४१६०१२.

दुरध्वनी क्रमांक :- (०२३१)२६९२३५१ | e-mail – smdw.kop@gmail.com

जा.क्र/विकाको/तांत्रिक/दरपत्रक/सीट दुरुस्ती/९५८९/1252-54/२०२६, दिनांक :- 03/11/२०२६.

प्रति,
मा. सहसंचालक, आरोग्य सेवा
(खरेदी कक्ष), १ ला मजला,
आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.

विषय :- सार्वजनिक आरोग्य विभागा-अंतर्गत मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांचे कार्यालया-अतंर्गत कार्यरत वाहन क्र. एम.एच. ०९ एजी ९५८९ (टाटा सुमो) वाहनाची सीट दुरुस्ती व इतर संबंधित कामे करण्याकरिता दरपत्रके सादर करणे बाबत.

संदर्भ:-१) महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. भाखस-२०१४/ प्र.क्र.८२/भागIII/उदयोग-४, दिनांक :- ३०/१०/२०१५.

मा. महोदय,

महाराष्ट्र शासन उद्योग-उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र. भाखस-२०१४/ प्र.क्र ८२/ भागIII /उदयोग-४, दिनांक :- ३०/१०/२०१५, शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तीका मधील परिच्छेद क्र. ४.२ मधील निर्देशानुसार दरपत्रकावर खरेदी करावयाच्या खरेदीची नोटीस विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी तसेच संकेतस्थळावर नोटीस प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून दरपत्रक सादर करण्यास कार्यालयीन कामाचे आठ दिवसाचा कालावधी देण्यात यावा असे निर्देशित केलेले आहे.

या अनुषंगाने आपणास विनंती करण्यात येत आहे की, या कार्यालयाकडून मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांचे कार्यालया-अतंर्गत कार्यरत वाहन क्र. एम.एच. ०९ एजी ९५८९ (टाटा सुमो) वाहनाचे सीट दुरुस्ती व इतर संबंधित कामे करण्याकरिता लागणाऱ्या सर्व साहित्याची व मजुरीची दरपत्रके सादर करणेबाबतची, दरपत्रकांची नोटीस (जाहिर सूचना) नमूने सोबत जोडून सादर करण्यात येत आहेत. सदर नोटीस दिनांक ०३ नोव्हेंबर २०२६ रोजी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी ही सविनय विनंती.

सोबत:- दरपत्रकांची नोटीस (जाहिर सूचना) नमूना.

प्रत माहितीसाठी सविनय सादर :-
१) मा. उपसंचालक, आरोग्य सेवा(परिवहन), पुणे.
२) मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ कोल्हापूर

सेवा व्यवस्थापक
विभागीय कार्यशाळा,
आरोग्य सेवा(परिवहन), कोल्हापूर.

महाराष्ट्र शासन

सेवाव्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा,
आरोग्य सेवा (परिवहन),
६०४ शेंडापार्क, आर.के.नगररोड, कोल्हापूर—४१६०१२.

दुरध्वनीक्रमांक :- (०२३१)२६९२३५१ | e-mail – smdw.kop@gmail.com

जा.क्र/विकाको/तांत्रिक/ दरपत्रक/सीट दुरुस्ती/९५८९/ 1255 /२०२६, दिनांक :- 03 / 11 /२०२६.

प्रति,

.....
.....
.....

विषय :- सार्वजनिक आरोग्य विभागा-अंतर्गत मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांचे कार्यालया-अतंर्गत कार्यरत वाहन क्र. एम.एच. ०९ एजी ९५८९ (टाटा सुमो) वाहनांची सीट दुरुस्ती व इतर संबंधित कामे करण्याकरिता दरपत्रके सादर करणे बाबत.

मा. महोदय,

सार्वजनिक आरोग्य विभागा-अंतर्गत, कोल्हापुर मंडळस्तरावरील विविध आरोग्य संस्थामध्ये कार्यरत रुग्णवाहिका वाहनांच्या (टाटा सुमो, [illegible]) सीट दुरुस्ती व इतर संबंधित कामे करण्याकरिता सर्व लागणाऱ्या साहित्याची व मजुरीची दरपत्रके मिळणे आवश्यक आहे.

यानुसार प्रस्तुत बाबींचे सर्व करांसह दर या कार्यालयास आपण सादर करावयाचे आहेत. सदर सर्व कर समावेशक दर आपले संस्थेच्या लेटर-हेडवर दिनांक १६/११/२०२६ रोजी दुपारी ३.०० पर्यत सिलबंद लिफाफ्यामध्ये या कार्यालयास सादर करावेत. सिलबंद लिफाफ्यावर "सार्वजनिक आरोग्य विभागा-अंतर्गत मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, कोल्हापूर मंडळ, कोल्हापूर यांचे कार्यालया-अतंर्गत कार्यरत वाहन क्र. एम.एच. ०९ एजी ९५८९ (टाटा सुमो) वाहनांची सीट दुरुस्ती व इतर संबंधित कामे करण्याकरिता दरपत्रके" असा स्पष्ट उल्लेख करावा.

-प्रपत्र-

अ.क्र	**वाहन क्र. एम.एच. ०९ एजी ९५८९ (टाटा सुमो) वाहनाची सीट दुरुस्ती व इतर संबंधित कामे करण्याकरिता लागणाऱ्या सर्व साहित्याचा व मजुरीचा तपशील**	दर
१	सीट दुरुस्ती (अल्टर करणे)	
२	सीट कुशन (सुमो ०५ सर्व)	
३	फ्लोअर मॅट बदलणे	
४	सर्व दरवाजे दुरुस्ती	
५	आतील सर्व लाईट्स दुरुस्ती (रुफ लाईट्स)	
६	बंपर दुरुस्ती	

दरपत्रके सादर करण्यासाठी दिनांक/वेळ आणि ठिकाण :

अ. क्र.	तपशील	कालावधी
१	या कार्यालयाचे सूचना फलकावर दरपत्रके सादर करणेसाठीचा नमुना प्रपत्र उपलब्ध असणे.	दि. ०३/११/२०२६ ते १६/११/२०२६, वेळ दु. ३.०० पर्यत.

२	दरपत्रके सादर करण्यासाठीची मुदत	दि. ०३/११/२०२६ ते १६/११/२०२६, वेळ दु.३.०० पर्यत.
३	दरपत्रके सादर करावयाचे ठिकाण	सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), शेंडापार्क, कोल्हापूर, ४१६०१२.

दरपत्रके उघडण्यासाठी दिनांक/वेळ आणि ठिकाणः

अ.क्र	तपशील	कालावधी
१	दरपत्रके उघडण्यासाठीचा दिनांक व वेळ	दि. १६/११/२०२६ वेळ दु.३.०० ते सा. ६.०० वाजेपर्यंत.
२	दरपत्रके उघडण्याचे ठिकाण	सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), शेंडापार्क, कोल्हापूर, ४१६०१२.

वरीलप्रमाणे दरपत्रके उघडण्याच्या दिवशी दरपत्रके सादर केलेल्या संबंधित संस्थांचे प्रमुख अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींस समक्ष उपस्थित राहणे आवश्यक आहे.

दरपत्रके सादर करणेबाबतच्या अटी व शर्ती :-

१) एका संस्थेने एकल दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे. सोबत खालीलप्रमाणे विहीत "प्रपत्र-अ" सेवा/खरेदी प्राधिकाऱ्या बरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि एकल दरपत्रक देण्याबाबत दरपत्रकाराची "हमीपत्र" सोबत जोडणे आवश्यक आहे.

२) दरपत्रके संस्थेच्या लेटर हेडवरच सही व शिक्क्यासह सादर करावे, तसेच त्यांचे GST क्रमांक नमूद करण्यात यावा. सोबत GST प्रमाणपत्र सादर करण्यात यावे.

३) अटी व शर्तीसह सादर करण्यात आलेल्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

४) दरपत्रकामध्ये खाडाखोड (Over writing) केल्याचे आढळल्यास सदर दरपत्रके विचारात घेतले जाणार नाही.

५) दरपत्रकामध्ये सादर केलेले दर हे स्थानिक बाजारभावास अनुसरुन असावेत तसेच सर्व संभाव्य खर्चासह (मजुरी व लागणारे साहित्य) आणि करांसह असावेत.

६) विहीत नमुन्यात सादर न केलेले दर पत्रके स्विकारण्यात येणार नाही.

७) विहीत मुदती नंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाहीत.

८) सदर कामकाजासाठी स्थानिक संस्थांचा/कार्यशाळेंचा विचार प्रथम प्राधाण्याने करण्यात येईल.

९) दर सादर करावयाच्या यादीमध्ये कुठल्याही प्रकारचा फेरफार केल्यास सदर दरपत्रके तात्काळ रद्द करण्यात येईल.

१०) दरपत्रके स्विकारणे अथवा पुर्णतः नाकारण्याचा पुर्ण अधिकार सेवा व्यवस्थापक, विभागीय कार्यशाळा, आरोग्य सेवा (परिवहन), कोल्हापूर यांचेकडे राहील.

सेवा व्यवस्थापक
विभागीय कार्यशाळा,
आरोग्य सेवा(परिवहन), कोल्हापूर.